॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)



## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. १६ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ करिता आविष्कार सल्लागार समितीची बैठक कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत विद्यार्थ्यांना द्यावयाच्या पारितोषिक रकमेत भरीव वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या बैठकीत प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, व्य प सदस्य जे. व्ही. साळी, अधिष्ठाता प्राचार्य एस. एस. राजपूत, प्रा. अनिल डोंगरे, प्रा. एस. टी. भुकन, समन्वयक डॉ. नवीन दंदी, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. जयेंद्र लेकुरवाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या बैठकीत अविष्कार संशोधन स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात दि. ४ डिसेंबर रोजी विद्यापीठ प्रशाळेंसाठी विद्यापीठात व दि. ८ डिसेंबर रोजी जिल्हास्तरीय स्पर्धा आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले. त्याकरिता जळगाव जिल्ह्यासाठी पी. आर. हायस्कूल सोसायटीचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगाव येथे, धुळे जिल्ह्यासाठी झेड. बी. पाटील महाविद्यालय, धुळे येथे जिल्हास्तरीय स्पर्धा ८ डिसेंबर रोजी आयोजित केली जाणार आहे. तर नंदुरबार जिल्ह्यासाठी विद्यापीठ संचलित कला विज्ञान महाविद्यालय, मोलगी व आदिवासी अकादमी नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी अकादमी, नंदुरबार येथे स्पर्धा जिल्हास्तरीय स्पर्धा ८ डिसेंबर रोजी आयोजित केली जाणार आहे. या तिन्ही जिल्हास्तरीय स्पर्धांसाठी प्रत्येकी २५ हजार रुपयांचा निधी आयोजन खर्चासाठी विद्यापीठाकडून देण्यात येणार आहे.

जिल्हास्तरीय स्पर्धा झाल्यानंतर विद्यापीठस्तरीय स्पर्धा दि. २३ व २४ डिसेंबर रोजी विद्यापीठात आयोजित केले जाणार आहे. या बैठकीत वित्त व लेखा अधिकारी सी ए रवींद्र पाटील, प्रा. रोकडे, प्रा. हरीभाऊ तिडके, प्रा. योगेश पाटील, प्रा. अमरदीप पाटील, प्रा. अजयगिरी गोस्वामी, प्रा. म. सु. पगारे, प्रा. रमेश सरदार यांची उपस्थिती होती.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १६ ऑक्टोबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता